# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## ( शिक्षण विभाग )

क्र. 3322/शि.वि. दि.29/10/2014

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापीका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्य. शाळा,
म.न.पा., नागपूर.

**विषय :— भारताचे लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबत.**

**संदर्भ** :— मा. शिक्षण संचालक माध्यमिक व प्राथमिक यांचे कार्यालयीन पत्र क्र. प्राशिसं / 2014 / सवपजयंती / ड / 516 दि. 27.10.2014.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, भारताचे लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांनी भारताच्या स्वतंत्रता चळवळीमध्ये व तद्नंतर अखंड भारताच्या निर्मीतीसाठी दिलेल्या मौलीक योगदानाचा गौरव व्हावा व सर्व स्तरातील जनतेला त्यांची कामगिरी प्रेरणादायी ठरावी या दृष्टीने त्यांचा जन्मदिवस 'राष्ट्रीय एकता दिवस' म्हणून अत्यंत उत्साहाने साजरा करावयाचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे. यानुसार खालीलप्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

**1. एकता प्रभात फेऱ्या** :— आपल्या शाळांमधून भारताचे लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांनी भारताच्या स्वतंत्रता चळवळीमध्ये व तद्नंतर अखंड भारताच्या निर्मीतीसाठी दिलेल्या मौलीक योगदानाबाबत आणि एकंदर जीवन चरीत्राबाबत विद्यार्थ्यांना परिचय करून दयावा. तद्नंतर आपल्या वार्डातून प्रभातफेरीचे आयोजन करावे. यात शाळा सुधार शिक्षण समितीचे सदस्य व नागरीकांना सहभागी करून घ्यावे.

**2. एकता दौड** :— जिल्हा प्रशासनाच्या वतीने राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्यासाठी सकाळच्या सत्रात एकता दौड कार्यक्रमाचे आयोजन संविधान चौक, कस्तुरचंद पार्कजवळ करण्यात आले आहे. आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना वार्डातील युवक / युवती स्वयंसेवी संस्था, क्रिडा मंडळे, गावकरी यांनी स्वयंप्ररणेने या एकता दौडीत सहभागी होण्याबाबत आपण प्रेरणा देवून आणि समन्वय साधून दि. 31.10.2014 रोजी सकाळी 8.00 वाजता एकता दौडमध्ये सहभागी व्हावे.

3. भारताचे लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांनी भारताच्या स्वतंत्रता चळवळीमध्ये व तद्नंतर अखंड भारताच्या निर्मीतीसाठी दिलेल्या मौलीक योगदानाबाबत व त्यांच्या जीवनावर आधारीत प्रश्न मंजुषेचा कार्यक्रमाचे आयोजन करावे.

केलेल्या कार्यवाहीचा अहवाल कार्यालयास सादर करावा.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर

PC:2/D:\reshma:/Tembhurne sir \ Letter 1.doc